**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १६ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा घालून देणं राज्यघटनेच्या विरोधात असल्याची भूमिका सरकारकडून सर्वोच्च न्यायालयात सादर.**
2. **राज्यात आज सर्वत्र दहीहंडीचा उत्साह, गोविंदा पथकांमध्ये दहीहंडी फोडण्यासाठी चढाओढ.**
3. **नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीने अंमली पदार्थ विरोधी सायकल रॅली वॉकेथॉन आयोजित, गोंदियात देखील रॅली आयोजित.**
4. **नागपूरसह विदर्भाच्या अनेक जिल्ह्यात आज मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा.**

---

**कालमर्यादा**

राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा घालून देणं राज्यघटनेच्या विरोधात आहे असं उत्तर, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात सादर केलं आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निकालाबाबत, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाला विचारलेल्या प्रश्नांवर सध्या सुनावणी सुरू आहे.कलम २०० आणि २०१ नुसार, अशी कालमर्यादा घालता येत नाही विधेयकांवर निर्णय घेणं हा राष्ट्रपती आणि राज्यपालांचा अधिकार आहे असं मेहता यांनी आपल्या उत्तरात म्हटलं आहे.

---

**जन्माष्टमी**

राज्यात गोकुळाष्टमीचा सण उत्साहात साजरा होत आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडीनिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दहीहंडीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यात विविध ठिकाणी दहीहंड्याचं आयोजन करण्यात आलं आहे. दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांमध्ये ही उत्साह असून गेल्या दोन महिन्यांपासून सराव केलेली दहीहंडी पथकं मानवी मनोरे रचत आहेत.ऑपरेशन सिंदूर द्वारे भारतीय सैन्य दलानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निर्धार आणि विचार प्रत्यक्षात उतरवला.पाकिस्तानमधील

दहशतवादी ठिकाणे नष्ट करून शत्रूला धडा शिकविला आणि आपल्या शौर्याची जगासमोर प्रचीती दिली आहे. आजच्या या दहीहंडी उत्सवातून गोविंदा पथकांनी सैन्य दलाच्या शौर्याला सलाम करण्याचे सुंदर काम केले आहे," असे गौरवोद्गार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ३४ सेकंद )***

***आपल्याला कल्पना आहे नुकतचं भारतीय सेनेने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातनं पाकिस्तानमध्ये घुसून पाकिस्तानच्या पापाची हंडी फोडली आहे आणि आता मोदीजींच्या नेतृत्वात विकासाची हंडी उंच उंच चाललेली आहे आणि विकासाचे मनोरे लाऊन त्या हंडीतील लोणी एक शेवटच्या माणसामध्ये पोहचवण्याचं निर्धार आम्ही सगळ्यांनी या ठिकाणी केला आहे.***

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने मुंबई शहर व उपनगरातील विविध कार्यक्रमांना भेट देऊन नागरिकांना शुभेच्छा दिल्या. नागपूरच्या महाल परिसरात बडकस चौक मित्र परिवाराच्या वतीने बडकस चौकात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या दहीहंडीला भेट दिली.

---

**शुभांशू शुक्ला**

यशस्वी अंतराळ मोहिमेनंतर, भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला उद्या भारतात परतणार आहे. भारतात परतल्यानंतर, आपल्या मूळ गावी लखनौला जाण्यापूर्वी तो पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटणार आहे.जून महिन्यात, ॲक्झिओम-४ मोहिमे अंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचणारे शुक्ला हे पहिले भारतीय बनले.१८ दिवसांच्या मोहिमेनंतर, १५ जुलै रोजी ते पृथ्वीवर परतले.

---

**वाजपेयी पुण्यतिथी**

माजी पंतप्रधान, अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथी निमित्त आज, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना, आदरांजली वाहिली. देशाच्या सर्वांगीण प्रगती प्रति, त्यांचं समर्पण आणि सेवाभाव सर्वांसाठी प्रेरणादायक असल्याचं, पंतप्रधानानी, समाज माध्यमावरच्या संदेशात नमूद केलं.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, जे.पी.नड्डा, किरेन रिजीजू, लोकसभा अध्यक्ष, ओम बिर्ला यांच्यासह, अनेक मान्यवरांनी, वाजपेयी यांच्या, 'सदैव अटल' या स्मृति स्थळावर, पुष्पांजली अर्पण केली.

---

**फास्टटॅग वार्षिक पास**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं काल, स्वातंत्र्यदिनी देशभरातल्या एक हजार १५० पथकर नाक्यांवर, फास्टटॅग वार्षिक पास सुविधा सुरू केली. काल सायंकाळी सात वाजेपर्यंत एक लाख ४० हजार जणांनी हा पास खरेदी केल्याचं, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं सांगितलं.यात महाराष्ट्रातल्या नाशिक-पेठ, सूरत-दहिसर, सातारा-कागल, पुणे-सोलापूर, खंडाळा-सातारा, सांगली-सोलापूर, पाटस-बारामती, नागपूर-कोंढली, नागपूर-हैदराबाद, अमरावती-चिखली, करोडी-छत्रपती संभाजीनगर, मंठा-परतूर, वर्धा-बुट्टीबोरी इत्यादी ९६ मार्गांवरल्या, पथकर नाक्यांचा समावेश आहे.

---------------------------------------

**ऑपरेशन थंडर**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय च्या वतीने "ऑपरेशन थंडर" अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिम निमित्ताने आज पोलीस जिमखाना, सिव्हिल लाईन्स येथून सकाळी सायकल रॅली व वॉकेथॉन आयोजिण्यात आली. १० किलोमीटर सायकल रॅली आणि पाच आणि अडीच किलोमीटर वॉकेथॉन रॅली पोलीस जिमखाना-रामगिरी टी पॉईंट जापानी गार्डन चौक - मो. रफी चौक -सेल टॅक्स ऑफिस जी.पी.ओ. चौक--अलंकार टॉकिज चौक-इंडसइंड बैंक चौक-काजीपुरा चौक-येथुन वळुन याच मार्गाने परत पोलीस जिमखाना इथं संपली सायकल रॅली व वॉकेथॉन मध्ये आमदार आशिष देशमुख , पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल, शालेय विध्यार्थी व नागपूरकरांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

---------------------------------------

**व्यसनमुक्ती**

एक धाव, व्यसन मुक्तीसाठी आणि अमली पदार्थ विरोधी मोहीम चालवण्यासाठी, गोंदिया जिल्हा पोलिसांनी पाच किलोमीटर मॅरेथॉनचं आयोजन आज केलं. या मॅरेथॉनमध्ये, गोंदिया शहरातील आणि ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणात युवक-युवती यांनी सहभाग घेतला.त्याच प्रमाणे पोलीस विभागातील, पोलीस शिपाई, कर्मचारी आणि अधिकारी यांनी सुद्धा या मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला. पुरुष गट आणि महिला गटमध्ये, प्रथम, द्वितीय आणि तृतीय आलेल्यांना, पारितोषिक देण्यात आलं.

---------------------------------------

**हवामान**

नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवल्यानुसार आज, विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यात, मेघगर्जनेसह मुसळधार ते अति मुसळधार

पावसाचा, ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून, जोरदार पावसासह, वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट, नागपूर, अकोला आणि अमरावती इथं जारी करण्यात आला आहे.याशिवाय उद्या देखील गडचिरोली, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट कायम राहणार असून, अमरावतीमध्ये, मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.दरम्यान नागरिकांनी सतर्क राहण्याचं आणि स्वतःची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आलं आहे.

-----------------------------------------

**गडचिरोली पाऊस**

गडचिरोलीसह जिल्ह्याच्या विविध तालुक्यांमध्ये आज मध्यरात्रीपासून सकाळपर्यंत, जोरदार पाऊस पडला. यामुळे नद्या आणि नाल्यांना पूर आला आहे. पुरामुळे, अहेरी तालुक्यातील, देवलमरी-व्यंकटापूर, गडचिरोली तालुक्यातील, पोटेगाव-देवापूर, चामोर्शी तालुक्यातील, तळोधी-विसापूर आणि चौडमपल्ली-चपराळा या मार्गांवरील, वाहतूक बंद आहे.मागील चोवीस तासांत, सिरोंचा तालुक्यात सर्वाधिक, ११६.४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल, अहेरी तालुक्यात ९२ मिलिमीटर पाऊस पडला.

-----------------------------------------

**पिकांचे नुकसान**

वाशिम जिल्ह्यात, सर्वत्र काल सायंकाळी चार वाजल्यापासून, पावसाला सुरुवात झाली असून, यानं सोयाबीन, हळद या पिकाचं प्रचंड नुकसान झालं. नदीकाठच्या शेतांमध्ये, पाणी शिरले असून, रिसोड तालुक्यात, या पावसाळ्यात चौथ्यांदा, ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आहे.रिसोड तालुक्यातील वाडी रायताळ इथं नाल्याच्या पुरामध्ये एक व्यक्ति वाहून गेल्याची घटना, आज सकाळी उघडकीस आली.

-----------------------------------------

**स्वातंत्र्य दिन**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी आणि अखिल भारतीय धम्मसेना यांच्या संयुक्त विद्यमानं, काल स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक, भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या हस्ते, दीक्षाभूमी इथं ध्वजारोहण करण्यात आलं.एन.सी.सी.च्या पथकानं, बॅन्ड संचालनात, अध्यक्ष ससाई आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या, दीपा पान्हेकर यांना, सन्मानानं, व्यासपीठापर्यंत घेऊन गेले. राष्ट्रगीतानं कार्यक्रमाचा समारोप झाला.भदंत सुरेई ससाई यांच्या हस्ते, तथागत गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला, पुष्पमाला अर्पण करून, अभिवादन करण्यात आलं. बाबासाहेबांच्या अस्थिकलशाला, वंदन केल्यानंतर, बुद्धवंदना घेण्यात आली.

-----------------------------------------

**महामेट्रो**

महामेट्रो नागपूर, फेज-टू वेळेत पूर्ण करण्यासाठी, कटिबद्ध असून, या प्रक्रियेचा भाग म्हणून, प्रायोरिटी सेक्शनमध्ये, प्रवासी सेवा सुरु करण्याचे उद्दिष्ट, येत्या एक ते दीड वर्षांत पूर्ण करण्याचे लक्ष आहे अशी माहिती, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक, श्रावण हर्डीकर यांनी दिली.ते काल स्वातंत्र्याच्या ७९व्या वर्धापन दिनानिमित्त, मेट्रो भवन इथं उपस्थित अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना संबोधित करत होते. त्यांनी ध्वजारोहण करून, नागपूर, पुणे, ठाणे आणि नवी मुंबई इथल्या सर्व कर्मचार्यांना, स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्यात.

-----------------------------------------